**CNRNOMHOS120004122025**
**नियमीत दिवाणी दावा क्र. २७१/२०२५**
**(जुना नि.दि.दा.क्र.४९८/२०१८)**
**धर्मराज व इतर वि.बबन व इतर**
**नि.क्र. ५१ खालील आदेश**
**(आदेश दि.२०/०३/२०२६)**

१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. **अर्जातील थोडक्यात कथने अशी की,**

वादींनी प्रतिवादी विरुध्द मालकी हक्काची घोषणा, निरंतर मनाईचा दावा व कब्जा मिळणेबाबतचा दावा दाखल केलेला आहे. दाव्यामधील परिच्छेद क्र.२ च्या शेवटी दाव्यामध्ये यापुढे दावा मिळकत असे संबोधले आहे "वादीने दाव्यासोबतच्या नकाशात दर्शविल्या प्रमाणे प्रतिवादींनी पुर्व बाजुकडुन व पश्चिम बाजुकडुन अतिक्रमण केलेले आहे. वादी हे एकत्रीतरित्या जमीन वहिवाटीत आहेत. गट नंबर २८,२९ व २९ व ३० पैकी गट नंबर २८ व २९ वर प्रतिवादींचे अतिक्रमण आहे." हा मजकुर परिच्छेद क्र.२ मध्ये समाविष्ट करणेबाबतची दुरुस्ती करण्याकामी अर्ज दाखल केला आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती वादीने केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादींचे म्हणणे असे आहे की, वादीचा सदरचा अर्ज कायदेशीर नाही. सदर प्रकरण वादीच्या साक्षीपुराव्यास नेमलेले असताना वादीने अनेक वेळा विविध कारणावर प्रकरणात पुराव्याकरीता तारखा वाढवुन घेतलेल्या आहेत. वादीने प्रस्तुतचा अर्ज विलंबाने दाखल केलेला आहे. वादी जाणुन-बुजुन प्रकरण लांबवण्याकरिता विविध अर्ज दाखल करीत आहे. म्हणुन त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. मे. न्यायालय अर्ज मंजुर करण्याच्या मतापर्यंत आल्यास वादीला रक्कम रुपये १०,०००/- कॉस्ट करण्याच्या अटीवर अर्ज मंजुर व्हावा असे नमूद केले आहे.

४. उभयपक्षकारांच्या वकिलांचा युकतीवाद ऐकला.

५. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणात वादमुद्ये निश्चित करण्यात आलेले आहेत. तदनंतर वादीने प्रस्तुत अर्ज सादर केला आहे. मुळ दावा हा दावा मिळकतीचा वादी कायदेशीर मालक असे घोषीत होऊन मिळण्यासाठी व प्रतिवादीकडून अतिक्रमित क्षेत्राचा ताबा मिळण्यासाठी दिलेला आहे. दाव्यातील वादीच्या कथनानुसार दावा जमीनी या वादीच्या वडीलोपार्जीत जमीनी आहेत. वादींच्या एकत्रीत मालकी व कब्जेवहिवाटीच्या जमीनी गट क्र. २८, २९, व ३० यांच्या जमीनीशी प्रतिवादी यांचा कसलाही हक्क संबंध नाही. बळाचा वापर करुन दावा जमीनीवर प्रतिवादींनी कब्जा केल्याचे दाव्यामध्ये कथन केले आहे. प्रतिवादींनी वादीच्या सदरील गटांवरील जमीनीवर पुर्व बाजुने व पश्चिम बाजुने अतिक्रमण केलेले आहे अशी दुरुस्ती करणेची विनंती केली आहे. दाव्यात दुरुस्ती केल्यास दाव्याच्या स्वरुपात काहीही बदल होत नाही व दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे काहीही नुकसान होत नाही म्हणुन अर्जात नमूद दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे.

६. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम २ नुसार प्रत्येक दाव्यामध्ये दाव्यातील मागणीच्या अनुषंगाने आवश्यक त्या बाबींचे कथन असणे गरजेचे आहे. दाव्यातील दुरुस्ती मागचा हेतु हा उभयपक्षकारांमधील विवादीत नेमका प्रश्न ठरवणे हा आहे. वादीच्या कथनावरुन हे स्पष्ट होते की, तो दाव्यातील त्याच्या मागणीच्या अनुषंगाने आवश्यक ती बाब त्याच्या दाव्यामध्ये प्रस्तुत अर्जातील दुरुस्तीद्वारे अंतर्भुत करु ईच्छीत आहे. त्यामुळे उभयपक्षकारांमधील वादातील नेमका प्रश्न ठरविण्यासाठी वादी त्या अनुषंगाने मागत असलेली दुरुस्ती रास्त व न्यायोचित वाटते. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच, दुरुस्ती अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीला कोणतीही बाधा पोहचणार नाही. त्याला दावा दुरुस्ती नंतर अतिरिक्त कैफियत देण्याची मुभा निश्चितच प्राप्त होणार आहे. प्रकरणात अद्याप वादीने पुरावा सादर केलेला नाही. वादीने दावा दुरुस्ती एवढया उशीरा मागणी करण्यामागचे कोणतेही कारण नमूद केलेले नाही. परंतु, प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप विचारात घेता ती दावा गुणदोषावर निकाली काढण्यास आवश्यक असल्याचे माझे मत आहे.

दुरुस्तीबाबतच्या अर्जाच्या विलंब पाहता उचित खर्चाच्या अटीवर अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल.

**<u>आदेश</u>**

१. निशाणी.क्र.५१ वरील अर्ज प्रस्तुत वादीने एकत्रीत रक्कम रुपये ५००/- खर्च म्हणुन प्रस्तुत प्रतिवादीस देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादीला दाव्यात मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादीने आज तारखेपासून १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरुस्ती करावी.

४. प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रस्तुत वादींनी सोसावा.

RAHUL DATTATRAY DANGE
Digitally signed by RAHUL DATTATRAY DANGE
Date: 2026.04.02 10:53:09 +0530

ठिकाण – भूम
दिनांक – २०/०३/२०२६.

(राहुल द. डांगे)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
भूम.

निं.दि.दा.क्र.२७१/२०२५
(जुना नि.दि.दा.क्र.४९८/२०१८)
निशाणी क्र. ५१

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr.Sayyad R.M.<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. R.D. Dange<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom, District - Osmanabad. |
| Date | --- | 20/03/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 20/03/2026 |
| Order uploaded on | --- | 30/03/2026 |